# करियर कट्टा उपक्रमाअंतर्गत उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार डॉ. मोहन खताळ यांना प्रदान

देगलूर। प्रतिनिधी

येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांना करिअर कट्टा या महाराष्ट्रशासन उपक्रमांतर्गत देण्यात येणारा नांदेड जिल्हा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार नुकताच स्वा. रा. तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते (दि २८फेब्रु.) रोजी एका भव्य कार्यक्रमात देण्यात आला.



या वेळी सहसंचालक डॉ. बोंदर यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच विद्यापीठ प्राध्यापक , कर्मचारीवर्ग तसेच देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विषयाचे प्राध्यापक व करियर कट्टाचे समन्वयक डॉ. संजय देवडे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांना पुरस्कार प्रदान झाल्याबद्दल अ. व्या. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील वेबरेकर, उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे ,सचिव शशीकांत चिद्रावार सहसचिव सूर्यकांतराव नारलावार कोषाध्यक्ष विलास तोटावार कार्यकारिणी सदस्य राजकुमार महाजन, गंगाधरराव जोशी, डॉ. कर्मवीर उन्नग्रतवार , जनार्दन चिद्रावार, रविंद्र अप्पा घाडे, देवेंद्र मोतेवार , चद्रकांत नारलावार उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे पर्यवेक्षक प्रा. एस एन पाटील , कार्यालयीन अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग व विद्यार्थी आदीने आभिनंदन केले आहे.

Scanned with OKEN Scanner